# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## (स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

## कार्यक्रमाचा अहवाल व लेखे

## २०२१ – २२

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## २०२१-२२

# नियमित कार्यक्रमाचा अहवाल

| कार्यक्रमाधिकारी | प्राचार्य |
| --- | --- |
| डॉ.के.डी.सावंत | डॉ.एम.एच.गव्हाणे |
| डॉ.पी.जी.त्रिमुखे | |
| डॉ. सचिन भंडारे | |

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल नियमित कार्यक्रम  २०२१ - २२

**१)  शाहू महाविद्यालयात पाच दिवसीय ऑनलाईन विशेष युवक शिबीर संपन्न : (दि. ११ ते १५ मे २०२१)**

कोवीड - १९ या वैश्विक महामारी मुळे अनेक मोठमोठ्या कार्यक्रमाला बंदी घातलेली असतांना शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मध्ये ऑफलाईन पध्दतीने संपूर्ण देशात कोणत्याही महाविद्यालयाला राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष युवक शिबीर घेता आले नाही. परंतु अशा या विपरीत परिस्थितीत  महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची एक पीढी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराच्या अनुभवापासुन वंचित राहू नये व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आभासी (ऑनलाईन) आणि ऑफलाईन कार्यक्रमाचे मिश्रण करत  'स्वतः साठी न जगता दुसऱ्या साठी जगले पाहिजे' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ब्रीदवाक्याला अनुसरून राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. ११ ते १५ मे २०२१ दरम्यान पाच दिवसीय ऑनलाईन विशेष युवक शिबीराचे आयोजन करण्यात आले. व राज्याचतच नाही तर देशात पहिल्यांदाच संपूर्ण समाजाला आदर्श वाटेल असा उपक्रम राबविले.व लातूरचा एक नवीन पॅटर्न तयार केला.

या पाच दिवसीय विशेष युवक शिबीराचे उद्धाटन दिनांक ११ मे २०२१ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. शिवराज बोकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. शिबीराच्या अध्यक्षस्थानी शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर चे अध्यक्ष डॉ. गोपाळरावजी पाटील हे होते. तर संपूर्ण शिबीरा दरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांची विशेष उपस्थिती होती. या ऑनलाईन विशेष युवक शिबीरात १८८  विद्यार्थी स्वयंसेवकांनी नोंदणी करुन  आपल्या घरातील इतर सदस्यांसह सहभाग घेतला. या शिबिरात  प्रा. शाहुराजे औताडे व प्रा. सोमदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सकाळी ६:०० ते ७:३० वाजेपर्यंत योग, प्राणायाम, व्यायाम आणि प्रार्थना घेण्यात आले. सकाळी ८:३० ते ९:३० या वेळेत शिबिरार्थी विद्यार्थ्यी स्वयंसेवकांना समाज कल्याण व पर्यावरण संवर्धनासाठी आपापल्या गावात राहून  रस्त्याच्या कडेला, घराच्या, गावाच्या किंवा शेतातील मोकळ्या जागेत  वृक्षारोपणाचे खड्डे खोदणे,  वृक्षारोप लागवड करणे, व शोष खड्डे खोदणे  असे शारिरीक श्रमदान करण्यासाठी वेळ देण्यात आले. संध्याकाळी ५:०० ते ६:३० च्या दरम्यान बौद्धिक विकासासाठी ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. तर रात्री ८:३० ते १०:०० वाजेपर्यंत ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

उपप्राचार्य डॉ.ए.जे.राजू, नागपूर येथील तहसीलदार श्री प्रताप वाघमारे, श्री संजय मोरे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, पर्यावरण तज्ञ डॉ.अतुल देऊळगावकर,  डॉ. बसवराज खुब्बा इत्यादींनी मार्गदर्शन करुन विद्यार्थ्यांना लाभान्वित केले.  दिनांक १५ मे २०२१ रोजी या शिबिराचा समारोप समारंभ संपन्न झाले. यावेळी प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली  प्रमुख पाहुणे म्हणून उत्तमराव पाटील कला व विज्ञान

महाविद्यालय दहिवेल, ता. साक्री, जि. धुळे येथील प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश अहिरे यांनी युवकांचे मनोगत ऐकुन घेत सकारात्मक विचार आणि ध्येय प्राप्ती बाबतीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक प्रा.संजय बिराजदार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय अशोक गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इत्यादींनी विशेष प्रयत्न केले.

2) **'तंबाकू / धूम्रपान मुक्ति' व 'प्रर्यावरण संवर्धन सामुहिक शपथ ग्रहण' साठी ऑनलाइन कार्यक्रम (दिनांक ५ जून २०२१)**

दिनांक ५ जून २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक प्रर्यावरण दिनानिमित्त सायंकाळी ठीक 6:00 वा. सर्व विद्यार्थ्यांना तंबाखु व धुम्रपान मुक्तीसाठी व पर्यावरण संवर्धनासाठी ऑलनलाईन शपथ देण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी यांनी विद्यार्थ्यांना तंबाखुच्या दुष्परिणामाबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सुमारे १३४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने उपस्थिती दर्शविली.

3) **ऑनलाईन आर्ट ऑफ लिव्हिंग कोर्स चे आयोजन: ( दि. १६ते १८ जून २०२१)**

दि. १६ ते १८ जून २०२१ च्या दरम्यान राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, आर्ट ऑफ लिव्हिंग कोर्स चे मार्गदर्शक डॉ. वसुंधरा गुडे, उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू , उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, उपप्राचार्य प्रा.सूचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा.सोमदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तीन दिवस ऑनलाईन आर्ट ऑफ लिव्हिंग कोर्स चे आयोजन करण्यात आले. यात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व शिबिराचा लाभ घेतला.

4) **हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती: (१ जुलै २०२१)**

दिनांक १ जुलै २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू , उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, उपप्राचार्य प्रा.सूचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा.विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, कार्यालयाचे प्रबंधक श्री. सतीश चव्हाण, अधीक्षक श्री. जगन्नाथ क्षीरनसागर, ग्रंथपाल डॉ. एस.बी. मस्के, सहायक ग्रंथपाल श्री पांडुरंग भोगीले व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

5) **स्व. जवाहरलाल दर्डा यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर: (७ जुलै २०२१)**

दिनांक ७ जुलै २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लोकमत समुह यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. जवाहरलाल दर्डा यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. कोरोना काळात रक्तदान अनमोल असल्याची भावना शिबिरातील रक्तदात्यांनी व्यक्त केली. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या हस्ते झाले. यावेळी लोकमत वृत्तपत्र चे संपादक श्री धर्मराज हल्लाळे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, उपप्राचार्या प्रा.सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता त्रिमुखे, प्रा.विजय गवळी, प्रा.सोमदेव शिंदे, प्रा. नानासाहेब काळे, स्वर्गीय विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेतील रक्तपेढी चे वैद्यिकय अधिकारी, तंत्रज्ञ, आणि इतर सदस्य उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात ३६ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

6) **राष्ट्रीय सेवा योजना समन्वय समितीची बैठक :(दि. ०६ ऑगस्ट,२०२१)**

दिनांक ०६ ऑगस्ट,२०२१ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील समन्वय समितीची बैठक मॅनेजमेंटहॉल मध्ये संपन्न झाली. या बैठकीत वर्षभर रासेयो विभागाच्या वतीने राबवण्यात येणा-या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. या बैठकीसाठी उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, उपप्राचार्य प्रा.सुचेता वाघमारे, समन्वय समिती सदस्य प्रा. राजेंद्र शास्त्री, डॉ.अनुजा जाधव, प्रा.विजज दळवी, डॉ.डी.बी.सोनकांबळे, डॉ.मस्के मैडम, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता त्रिमुखे, डॉ.सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इत्यादी उपस्थित होते.

7) **मौजे वाघोली गावातील जिल्हा परिषद शाळेत संगणक लॅबची दुरुस्ती व अद्ययावतीकरण (दि. १३ ऑगस्ट २०२१)**

दि. १३ ऑगस्ट २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे वाघोली, ता. औसा, जि.लातूर या गावातील जिल्हा परिषद शाळेत संगणक लॅबचे दुरुस्ती व अद्ययावतीकरण करण्यात आले. यावेळी जि.प. शाळेचे मुख्याध्यापक श्री शेख सर यांच्या प्रमुख उपस्थितीत संगणक ऑपरेटर प्रा. नर्सींग शिंदे व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी यांनी जिल्हा परिषद शाळेतील संगणक कक्ष मध्ये संगणकाची जोडणी करून लॅबचे अद्ययावतीकरण करून दिले.

8) **स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण (१५ ऑगस्ट २०२१)**

दिनांक १५ ऑगस्ट २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी, व महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### 9) स्व.राजीव गांधी जयंती व सांप्रदायिक सद्भावना दिन (२० ऑगस्ट २०२१)

दिनांक २० ऑगस्ट २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्व.राजीव गांधी जयंती निमित्त सांप्रदायिक सद्भावना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, उपप्राचार्य प्रा.सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता त्रिमुखे, डॉ.सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इत्यादी उपस्थित होते.

### 10) स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव व जागतिक युवा दिनानिमित्त ऑनलाईन व्हिडीओ क्लिप निर्मिती, पोस्टर स्पर्धा व मास्क डिझाईन स्पर्धा संपन्न: (दि. ३० आगष्ट ते ५ सप्टेंबर २०२१)

दिनांक दि. ३० आगष्ट ते ५ सप्टेंबर २०२१ दरम्यान स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव व जागतिक युवा दिनानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व रेड रिबन क्लब लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एचआयव्ही-एड्स व या विषयावर जनजागृती साठी ऑनलाईन व्हिडीओ क्लिप निर्मिती, पोस्टर स्पर्धा व मास्क डिझाईन स्पर्धा संपन्न झाली. या व्हिडीओ क्लिप निर्मिती स्पर्धेत चि. रणवीर धर्मराज हल्लाळे याने प्रथम क्रमांक पटकावले तर कु. साक्षी प्रकाश बजुळगे आणि कु. आर्शिया फिरोज शेख यांनी द्वितीय क्रमांक व कु. मनियार नुजहत खलील हिने तृतीय क्रमांक पटकावले.

पोस्टर स्पर्धेत कु. नेहा अंकुश जाधव हिने प्रथम क्रमांक पटकावले. कु. श्रद्धा सुनील जाधव, कु. साक्षी सुरेश कुलकर्णी यांनी द्वितीय तर कु. कल्याणी कुलदीप बिराजदार हिने तृतीय क्रमांक प्राप्त केले. मास्क डिझाईन स्पर्धेत कु. मनियार सानिया खलील हिने प्रथम क्रमांक पटकावले तर कु. नीलम अमीर पठाण व कु. श्रद्धा घुटे यांनी क्रमशः द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले. सर्व स्पर्धकांचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन करण्यात आले. स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू , उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, रेड रिबन क्लबचे सदस्य शिवाजी बिरादार यांनी विशेष प्रयत्न केले.

### 11) संजीवनी बेटावर वृक्षसंवर्धन, प्लास्टिक मुक्तता आणि स्वच्छता अभियान: (४ सप्टेंबर २०२१)

दिनांक ४ सप्टेंबर २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व लातूर वृक्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वडवळ नागनाथ, ता.चाकुर, जि. लातूर येथील संजीवनी बेटावर वृक्षसंवर्धन, प्लास्टिक मुक्तता आणि स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात लातूर वृक्ष समिती चे सदस्य व दक्ष नागरिक श्री. सुपर्ण जगताप, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

12) **रासेयो च्या स्थापना दिनानिमित्त ऑनलाइन कार्यक्रम: (दि.२४ सप्टेंबर २०२१)**

दि.२४ सप्टेंबर २०२१ रोजी रासेयो च्या स्थापना दिनानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागच्या वतीने ऑनलाइन कार्यक्रम कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात रासेयो च्या विद्यार्थी स्वयंसेवकांना एनएसएस च्या माध्यमातून राबवण्यात येणा-या कार्यक्रमांची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्ट्ये विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, इत्यादी उपस्थित होते.

13) **राजर्षी शाहू महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न :(१ ऑक्टोंबर २०२१)**

दिनांक १ ऑक्टोंबर २०२१ रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर गोपाळरावजी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त व फिट इंडिया आजादी का अमृत महोत्सवी वर्ष यानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना क्रीडा व हेल्थ अँड वेलनेस विभागातर्फे महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले या शिबिराचे उद्घाटन शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव यांनी केले यावेळी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या उपस्थितीत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची रक्तदाब बीपी रक्तातील साखरेचे प्रमाण आर बी सी वय उंची व वजनानुसार बी एम आय व आरोग्यविषयक मोफत तपासणी करण्यात आली. शिबिरात २६० पेक्षा जास्त लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, भूतपूर्व प्राचार्य डॉ. आर. एल. कावळे, संस्थेचे सदस्य श्री आनंद माने, श्री मकरंद देशमुख, प्राचार्य डॉक्टर महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉक्टर ए.जे. राजू , प्रा. सदाशिव शिंदे, कौशल विकास केंद्र लातूर चे सहाय्यक आयुक्त श्री बालाजी मरे, श्री राजु वाकडे, शैल्य चिकित्सक डॉ. स्वाती फेरे, डॉ. बसवराज खुब्बा, क्रीडा विभागाचे अध्यक्ष डॉ.अनिरुद्ध बिराजदार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. रत्नराणी कोळी, प्रा. नानासाहेब काळे इत्यादी व महाविद्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14) **महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त फिट इंडिया फ्रीडम रन २.० या कार्यक्रमाचे आयोजन: (दि.०२ ऑक्टोंबर २०२१)**

दि.०२ ऑक्टोंबर २०२१ राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त हार्दिक अभिवादन करण्यात आले.तसेच आजादी का अमृत महोत्सव उपक्रमांतर्गत 'फिट इंडिया फ्रीडम रन २.०' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रशासकीय अधिकारी प्रा. एस.एम.तलवारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू , उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे,

तसेच महाविद्यालयातील परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, डॉ. दीपक वेदपाठक आणि इतर प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**15) राजर्षी शाहू महाविद्यालयात डॉक्टर गोपाळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न:(४ ऑक्टोंबर २०२१)**

दिनांक ४ ऑक्टोंबर २०२१ रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ.गोपाळराव जी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त व स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा विभाग व आरोग्य विभागांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्धाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी केले.

या रक्तदान शिबिरात डॉ. स्वाती फेरे, डॉ. अनिरुद्ध बिराजदार, डॉ. सचिन भंडारे, प्रा. राजपाल पाटील, प्रा. अरविंद कदम, डॉ.बसवराज खुबा, प्रा. ईश्वर पाटील, प्रा. प्रशांत पांचाळ, श्री विजयकुमार इगवे, कु. पूजा शिंदे यांच्यासह एकूण १७ जणांनी रक्तदान केले. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू , उपप्राचार्या प्रा. सूचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. रत्नराणी कोळी, शासकीय रक्त संक्रमण परिषद लातूरचे सहयोगी डॉ.के.पी. दळवी, समाजसेवा अधीक्षक डॉ. एस. आय. चौधरी, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अंकिता सोनवणे, सहाय्यक तंत्रज्ञ श्री गवळी शंकर, श्री जगदीश रामदासे इत्यादींनी विशेष प्रयत्न केले.

**16) रा.से.यो. विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया:( १४ ते २० ऑक्टोंबर २०२१)**

दिनांक १४ ते २० ऑक्टोंबर २०२१ दरम्यान राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून घेण्यात आले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू, उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी प्रयत्न केले.

**17) मौजे कासारगाव येथे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान दिनांक: (२८ ऑक्टोंबर २०२१)**

दिनांक २८ ऑक्टोंबर २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मौजे कासारगाव,ता.जि. लातूर येथे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान राबविण्यात आले. प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात उपप्राचार्य डॉ.ए.जे.राजू, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. पी.आर. रोडिया, डॉ.धुमाळ सर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनीही परिश्रम घेतले. या कार्यक्रमात मुलगी वाचवा, मुलगी शिकवा या संदर्भात जनजागृती करण्यात आली. एकुण ५६ जणांचा सहभाग या कार्यक्रमात होता. कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. पुष्पलता त्रिमुखे यांनी केले.

**18) COVID-19 मुक्तीसाठी लसीकरण शिबिर संपन्न: (दि.२८ ऑक्टोंबर २०२१)**

दि.२८ ते ३०ऑक्टोंबर २०२१ या दरम्यान आजादी का अमृत महोत्सव व मिशन युवा स्वास्थ राखण्यासाठी शिवछत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचालित राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा, एनसीसी, विभाग व लातूर शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने covid-19 मुक्तीसाठी लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर महादेव गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले सदर शिबिरात 18 व त्यापेक्षा जास्त वय वर्ष असणाऱ्या लाभार्थ्यांना कोविशिल्ड व कोव्हॅक्सीन ही लस देण्यात आली. २२७ पेक्षा जास्त लाभार्थ्यांनी या शिबिरात लसीकरण करून लाभ घेतला.

सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू , उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे , डॉ. ओम प्रकाश शहापूरकर, डॉ. अनिरुद्ध बिराजदार, प्रा. रत्नराणी कोळी, म..न.पा. लातूरचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमृता बाचे, डॉ.परमेशवर सुर्यवंशी, श्री राजकुमार आडे, श्री सारगे बालाजी, स्टाफ नर्स सौ. गोरटे आर. व्ही., कु.बचाटे ऋतुजा, कु. मडके सुवर्णमाला, श्री संकेत लाके, आशा वर्कर सौ. सय्यद क्षमा,सौ. हनुमंते प्रियंका व रासेयो च्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम केले.

**19) सरदार वल्लभ भाई पटेल जयंती व स्व. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी निमित्त राष्ट्रीय एकता व आत्मनिर्भरतेची शपथ.(दि.०१ नोव्हेंबर २०२१)**

दिनांक ३१ऑक्टोंबर च्या सरदार वल्लभभाई पटेल जयंती व स्व. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी निमित्त दि.०१ नोव्हेंबर २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दोन्ही महान विभूतींना वादन करण्यात आले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांना राष्ट्रीय एकता व आत्मनिर्भरतेची शपथ देण्यात आली. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व प्रा.संगीता तोडकर हे उपस्थित होते.

**20) पर्यावरण संरक्षण व जनजागृती अभियानासाठी व्याख्यान (२४ नोव्हेंबर,२०२१)**

दिनांक २४ नोव्हेंबर,२०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली "पर्यावरण संरक्षण व जनजागृती अभियानासाठी व्याख्यान" आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात संपूर्ण भारतभर सायकल वर भ्रमण करणारा युवक श्री शिवाजी पाटील व लातूर वृक्ष समिती चे समन्वयक श्री सुपर्ण जगताप यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सोमदेव शिंदे यांनी आणि आभार प्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी केले.

21) **भारतीय संविधान दिनानिमित्त पोस्टर व रांगोळी स्पर्धांचे आयोजन: (दि. २६ नोव्हेंबर २०२१)**

दि. २६ नोव्हेंबर २०२१ राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय संविधान दिनानिमित्त पोस्टर प्रदर्शन व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू , उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी परिश्रम घेतले.

22) **एक विद्यार्थी एक झाड योजना (one student one tree): (दिनांक ११ ऑगस्ट २०२१ पासून वर्षभर)**

दिनांक ११ ऑगस्ट २०२१ पासून वर्षभर राजर्षी शाहू शाहू कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी एक विद्यार्थी एक झाड योजना (one student one tree) राबविण्यात आली. या योजनेअंतर्गत महाविद्यालयात शिक्षण घेणारया प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरासमोर रस्त्याच्या कडेला शेतात किंवा ज्या ठिकाणी वृक्ष लागवड करुन त्याचे संवर्धन करणे शक्य आहे अशा ठिकाणी दिनांक १२ ऑगस्ट २१ ते २० ऑगस्ट २०२१ दरम्यान किमान एक वृक्षाची लागवड करून वर्षभर त्याचे संवर्धन करणे अनिवार्य केले. व वृक्षारोपण कार्याचे GPS MAP CAMERA च्या माध्यमातून फोटो अहवाल विद्यार्थ्यांकडून सादर केले गेलेत. या योजनेअंतर्गत १८५० पेक्षा जास्त वृक्षांची लागवड केली गेली. सदर योजना यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू , उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी प्रयत्न केले.

23) **क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त स्त्री-पुरुष समानतेची शपथ:**

**(०३ जानेवारी २०२२)**

०३ जानेवारी २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना स्त्री-पुरुष समानतेविषयी शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे हे होते . तर सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. कांचन प्रभा मस्के यांनी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती लावून उपस्थितांना मार्गदर्शन करताना "विविध क्षेत्रातील महिलांचे आजचे यश हे स्वातंत्र्यता पूर्वी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी भोगलेल्या अवहेलनांचा व त्यांनी स्त्री शिक्षणाविषयासाठी घेतलेले परिश्रम यांचा परिणाम आहे." असे मत प्रकट केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत यांनी स्त्री-पुरुष समानतेची शपथ दिली. अध्यक्षीय समारोप करताना उप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे यांनीही "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळेच आज समाजात महिलांना प्रतिष्ठा लागून त्या आज सक्षम बनल्या." असे मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर महादेव गव्हाणे कार्यक्रमाधिकारी डॉक्टर पुष्पलता त्रिमुखे सचिन भंडारे ग्रंथपाल श्री एस.बी. मस्के, सहाय्यक ग्रंथपाल श्री पांडुरंग भोगीले, परिचारक श्रीमती सावंत, व महाविद्यालयातील इतर

प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोमदेव शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी व्यक्त केले. विद्यार्थी स्वयंसेविका नुरजहॉ यांनीही आपले विचार व्यक्त केले.

### 24) **सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती निमित्त ऑनलाइन भाषण स्पर्धा:(दि.२३ जानेवारी २०२२)**

दि.२३ जानेवारी २०२२ रोजी आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत थोर क्रांतिकारक नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती निमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व भारत स्काऊट गाईड विभागाच्या वतीने ऑनलाइन भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत चि.अक्षित हेरकर याने प्रथम क्रमांक पटकावले. तर कु.प्रिया बालाजी मोरे, चि.आदित्य दराडे यांनी द्वितीय क्रमांक व कु. आकांक्षा सुनील लांडगे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केले. सर्व स्पर्धकांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर महादेव गव्हाणे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आले. स्पर्धा यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू, उपप्राचार्या प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, रेड रिबन क्लबचे सदस्य शिवाजी बिरादार यांनी विशेष प्रयत्न केले.

### 25) **शाहू महाविद्यालयात ३५७९ पेक्षा जास्त किशोरवयीन विद्यार्थ्यांना कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण:(२७ ते ३० ऑक्टोंबर २०२१ व १० ते १८ जानेवारी २०२२)**

दिनांक: २७ ते ३० ऑक्टोंबर २०२१ व ०८ ते १८ जानेवारी २०२२ च्या दरम्यान covid-19 पासून मुक्तीसाठी व प्रतिबंधात्मक उपाय म्हणून महानगरपालिका आरोग्य केंद्र लातूर च्या वतीने राजर्षी शाहू महाविद्यालयातील १५ ते १८ वर्ष वयोगटातील किशोरवयीन विद्यार्थ्यांना कोव्हॅक्सीन या कोविड प्रतिबंधात्मक लसद्वारे लसीकरण करण्यात आले.या अभियानात ३५७९ पेक्षा जास्त लाभार्थ्यांनी लस घेतली. छत्रपती शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव वैद्यकीय अधिकारी डॉक्टर अमृता बाचे डॉक्टर सना शेख व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर महादेव गव्हाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण अभियान मोहीम राबविण्यात आली.

लसीकरण शिबिर यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य डॉ.ए.जे. राजू, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, उपप्राचार्य प्रा. सुचेता वाघमारे, प्रशासकीय अधिकारी प्रा. एस. एम. तलवारे, पर्यवेक्षक प्रा. संजय बिराजदार, प्रा.डी. के. देशमुख राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा.सोमदेव शिंदे, प्रा.जयराज गंगणे, प्रा.विनोद झरीटाकळीकर, प्रा.अभयसिंह देशमुख, प्रा. रत्नराणी कोळी, प्रा. सुदर्शन पाटील, कार्यालयीन अधीक्षक श्री. जगन्नाथ क्षीरसागर, आरोग्य पर्यवेक्षक श्री. राजकुमार आडे, आरोग्य सेवक श्री. अनिकेत मोरे, आरोग्य सेविका सौ. शारदा गायकवाड, सौ रंजना गोरटे, श्वेता सोनवणे, स्टाफ नीर्गुना जानकर, आरती कांबळे, आशा वर्कर शमा सय्यद, प्रियंका हनुमंते,डेटा ऑपरेटर श्री संकेत लाके, श्री मल्हारी देवकते, श्री आशिष स्वामी, श्री महेंद्र सातपुते, महाविद्यालयातील कर्मचारी श्री संगमेश्वर भंगे, पंकज किनगावकर व इतर प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

26) **स्वामी विवेकानंद व राजमाता मॉ जिजाऊ यांची जयंती साजरी: (दि.१२जानेवारी, २०२२)**

दि.१२जानेवारी, २०२२ रोजी राजषी शाहू महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंती प्रसंगी प्राध्यापक माधव शेळके व प्राध्यापक भैरवनाथ गोरटे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, ग्रंथपाल श्री एस.बी. मस्के, सहाय्यक ग्रंथपाल श्री पांडुरंग भोगीले, कार्यालयीन प्रबंधक ,श्री सतीश चव्हाण, अधीक्षक श्री जगन्नाथ क्षीरसागर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, इधर प्रा. आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

27) **राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त ऑनलाईन व्याख्यान कार्यक्रम: दि.२५ जानेवारी २०२२)**

दि.२५ जानेवारी २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारत स्काऊट गाईड विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी ३:०० वा. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त ऑनलाइन व्याख्यानाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे व डॉ. स्वाती शेळके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू, उपप्राचार्य प्रा. सुचेता वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा.सोमदेव शिंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी व स्काऊट गाईड रोव्हर युनिट लीडर प्रा.विजय गवळी, रोव्हर युनिट लीडर प्रा. श्रीनिवास मोरे, रेंजर युनिट लीडर प्रा. संगीता तोड़कर, प्रा.रत्नरानी कोळी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर पुष्पलता त्रिमुखे, सूत्रसंचालन प्रा. विजय गवळी यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. कल्याण सावंत यांनी केले.

28) **राष्ट्रीय मतदान जागृती दिनानिमित्त शपथ शपथ ग्रहण कार्यक्रम दि.२५ जानेवारी २०२२**

दि.२५ जानेवारी २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारत स्काऊट गाईड व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी २:०० वा. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त जनजागृती साठी शपथ ग्रहण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांच्या मार्गदर्शनातून उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू यांच्या प्रमुख उपस्थितीत उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी उपस्थितांना मतदार जनजागृती साठी शपथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सुदर्शन पाटील तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा.सोमदेव शिंदे यांनी केले. यावेळी मंचावर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे, डॉ.अर्चना टाक, प्रा. रत्नराणी कोळी इत्यादी व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

29) **७५ कोटी सूर्यनमस्कार प्रशिक्षण मोहीम कार्यक्रम दि.२५ जानेवारी २०२२**

दि.२५ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ५:०० वा. राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारत स्काऊट गाईड व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृत महोत्सव अंतर्ग ७५ कोटी सूर्यनमस्कार प्रशिक्षण मोहीम कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ महादेव

गव्हाणे यांच्या मार्गदर्शनातून उपप्राचार्य डॉ. ए.जे.राजू, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमात प्रा. शाहराजे औताडे यांनी यांना मार्गदर्शन करत सूर्यनमस्काराचे योग प्रशिक्षण दिले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, डॉ.अनिरुद्ध बिराजदार, प्रा. रत्नराणी कोळी स्काऊट गाईड यूनिट लीडर प्रा. श्रीनिवास मोरे, प्रा.संगीता तोड़कर इत्यादी व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 30) महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त ऑनलाइन हुतात्मा दिन कार्यक्रम: (दि.३० जानेवारी २०२२)

